राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यासाठी ई- गव्हर्नन्स खाली उपलब्ध तरतुदी मधून निधी वितरित करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१३ /मातंक
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ.
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीखः १२ एप्रिल,२०१९

वाचा :

१) या विभागाचा शा.नि.क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१३/मातंक, दि. २२ फेब्रुवारी, २०१९.
२) या विभागाचा शासन आदेश क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१३/मातंक, दि. ०२ मार्च, २०१९
३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १ एप्रिल, २०१९.

प्रस्तावना :

राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्याचा निर्णय या विभागाच्या दि.२२/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष नसल्यामुळे प्रथम टप्प्यात सदर कालावधीसाठी या योजनेकरिता निधी “लेखाशिर्ष ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा-(०१)(०३)- ई गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च- (३४५१ २८०८) मागणी क्रमांक एल-४ (योजनांतर्गत) (दत्तमत)” या लेखाशिर्षातंर्गत भागविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१८-१९ मध्ये शेवटच्या तिमाहीसाठी रू. ७६ कोटी इतका निधी उपलब्ध करून द्यावयाचा होता. तथापि, या विभागाच्या दि. ०२ मार्च,२०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये गावठाण जमाबंदी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याकरिता मध्ये उपरोक्त लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध रू. २,००,००,०००/- (अक्षरी रू. दोन कोटी) इतका निधी कार्यालय अधिक्षक (लेखा), जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी अनुपलब्धतेमुळे वितरित करणे शक्य झाले नाही. सदर बाब मा. शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६/०३/२०१९ रोजीच्या बैठकीत निदर्शनास आणण्यात आली होती. तथापि, आर्थिक वर्षाचे १५ दिवस शिल्लक असतांना सन २०१९-२० मध्येच तातडीने निधी उपलब्ध करण्याचे समितीने निदेश दिले.

सदर प्रकल्पाचे काम सुरू झाले असुन भारतीय सर्वेक्षण विभागाकडून ड्रोन खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यास्तव या प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध देणे आवश्यक आहे. या विभागास “लेखाशिर्ष ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा-(०१)(०३)- ई गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च- (३४५१ २८०८) मागणी क्रमांक एल-४ (योजनांतर्गत) (दत्तमत)” या लेखाशिर्षातंर्गत सन २०१९-२० मध्ये उपलब्ध झालेल्या रू. १०कोटी इतक्या निधी पैकी रू.४ कोटी

इतका निधी सदर प्रकल्पाकरिता वितरित करण्याचे मा. प्रधान सचिव (ग्रामविकास) यांनी निदेश दिले आहेत. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहेत-

शासन आदेश :

राज्यातील सर्व गावाचे गावठाण भूमापन करून मिळकत पत्रिका स्वरूपात अधिकार अभिलेख तयार करणे व गावातील मालमत्तांचे जी.आय.एस. आधारित रेखांकन व मुल्यांकन करणे यासाठी पहिल्या टप्प्याकरिता यापूर्वी दि.०२ मार्च,२०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये रू. २,००,००,०००/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरू झाले असुन भारतीय सर्वेक्षण विभागाकडून ड्रोन खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने आता प्रधान सचिव (ग्रामविकास) यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर प्रकल्पासाठी रू. ४,००,००,०००/- (अक्षरी रू. चार कोटी) इतका निधी कार्यालय अधिक्षक (लेखा), जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्यात यावा.

२. सदर खर्च "लेखाशिर्ष ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा-(०१)(०३)- ई गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च-(३४५१ २८०८) मागणी क्रमांक एल-४ (योजनांतर्गत) (दत्तमत)" या लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२० मध्ये उपलब्ध झालेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १ एप्रिल, २०१९ मधील तरतुदींचे पालन होत आहे.

४. सदरचा शासन आदेश वित्त विभाग, क्रमांक: विअप्र- २०१३ /प्र.क्र.३० /२०१३ /विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्ठातील भाग पहिला, उपविभाग दोन, अनुक्रमांक २७-अ, नियम क्रमांक-७६, अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०९१०४९०३९६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2019.04.12 13:28:58 +05'30'

प्रविण जैन

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर

२) उप सचिव,(रोखशाखा),ग्रामविकास विभाग, मंत्रालय.मुंबई.

३) जमाबंदी आयुक्त तथा संचालक , भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे .

४) कार्यालय अधिक्षक (लेखा), जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), ग्रामविकास विभाग,मंत्रालय.मुंबई

६) निवड नस्ती व बजेट नस्ती (माहिती तंत्रज्ञान कक्ष), ग्रामविकास विभाग , मंत्रालय.मुंबई